राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक/उच्च
माध्यमिक शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या
<u>नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती.</u>

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-विपसू-२००७/(१५७/०७)/माशि-२
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १० एप्रिल,२००७.

<u>वाचावे</u> :- १) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग,क्रमांक-एसएसएन-२६९५/(३९६/९५)/माशि-२, दिनांक ३१ डिसेंबर,२००२.
२) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग,क्रमांक-एसएसएन-१७०२/(१६०/०२)/माशि-२, दिनांक ६ फेब्रुवारी,२००४.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ दिनांक २२ ऑगस्ट,२००५.
४) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग,क्रमांक-एसएसएन-१००७/(१३७/०७)/माशि-२, दिनांक २८ मार्च,२००७.

<u>परिपत्रक</u> :- शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी (अनुदानित/विना अनुदानित) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नातेवाईकांना अनुकंपा तत्वावर सामावून घेण्यासंदर्भात वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत.

सन २००० पासून शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीवर बंदी होती, त्यामुळे मान्यताप्राप्त खाजगी शाळांमधून शिक्षकेतर कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्यात आलेली नव्हती. शासनाने आता शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक-एसएसएन-२६०३/(४१/०३)/माशि-२, दिनांक २५ नोव्हेंबर,२००५ च्या शासन निर्णयान्वये शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी सुधारित आकृतिबंध निश्चित केला आहे. त्यानुसार, शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीवर आता बंदी नाही.

अनुकंपा तत्वावरील पदे भरण्यात येत नसल्याबाबतचा मुद्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन-२००७ मध्ये उपस्थित करण्यात आला होता. त्यावर या परिपत्रकान्वये शासन पुन्हा अशा सूचना देत आहे की, अनुकंपा तत्वावरील पदे भरण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन, शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अनुकंपा

भरतीसदंर्भात दिनांक २५ नोव्हेंबर,२००५ अन्वये विहित करण्यात आलेल्या सुधारित निकषानुसार प्रस्ताव तपासून शिक्षकेतर कर्मचा-यांची भरती करण्यात यावी.

हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००७०४१०१६११२३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार

( श्री. भि. होटकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

\ 152-07